RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १२, अंक ३२(६)] बुधवार, एप्रिल २९, २०२६/वैशाख ९, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ६०**

**प्राधिकृत प्रकाशन**

### शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित

**सूचना**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० च्या उपकलम (२) नुसार

**नगररचना परियोजना क्रमांक १४ (टीपीएस-०१४)**

CIDCO/CP(NAINA)/TPS-13 & 14/2026/1471

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम, १९६६ (महा. अधिनियम XXXVII, १९६६ ) (येथून पुढे 'उक्त अधिनियम' असे निर्देशित केलेले), च्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने, दिनांक १०.०१.२०१३ रोजीच्या, अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.-९८/१२/नवि-१३ अन्वये वेळोवेळी झालेल्या सुधारणां अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित केलेले) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) (येथून पुढे महामंडळ असे निर्देशित केलेले) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित केलेले) म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने दिनांक २७.०४.२०१७ रोजीच्या, अधिसूचना क्र. टीपीएस-१२१५/२४५/सीआर-३३२/२०१५/ एस.एम./यूडी-१२, नुसार नैनातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आहे. आणि दिनांक ०१.०३.२०१९ रोजीच्या, अधिसूचना क्र. टीपीएस. १२१५/२४५/प्र.क्र. ३३२/१६/ई.पी./नवि-१२ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उपकलम (१) नुसार अंतरिम विकास आराखड्याचा वगळलेला भाग मंजूर केला आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने दिनांक १६.०९.२०१९ रोजीच्या, अधिसूचना क्र. टीपीएस -१७१७/स. क्र. २७५०/ प्र. क्र. ९१/ २०१९/ नवि-१३, नुसार नैनातील १५२ गावांसाठीचा विकास आराखडा मंजूर केला आहे ( विकास योजनेत दर्शविलेले ई.पी. म्हणून निर्देशित केलेले सारभूत फेरबदल वगळून);

आणि ज्याअर्थी, नगरविकास विभागाच्या (UDD) दिनांक ०४.०३.२०२४ रोजीच्या, अधिसूचना क्र. TPS-1221/2461/ C.R.83/21/UD-12 अन्वये, सदर अधिनियमाच्या कलम १६० अंतर्गत, 'नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रातील (NAINA) ८० गावांसाठी आणि 'खोपटा नवीन शहर अधिसूचित क्षेत्रा'तील ३३ गावांसाठी 'सिडको'ची (CIDCO) 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून केलेली नियुक्ती शासनाकडून रद्द करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, 'NAINA' क्षेत्रासाठीचा 'अंतरिम विकास आराखडा' (IDP) आणि 'विकास आराखडा' (DP) सध्या 'नगररचना परियोजनांद्वारे (TPS) १ ते १२ पर्यंत राबविला जात आहे आणि या योजना पूर्णत्वाच्या विविध टप्प्यांवर आहेत. याच धर्तीवर, नैना विकास आराखड्यातील उर्वरित भागाचा विकास, नगररचना परियोजना १३ च्या माध्यमातून करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, दिनांक ०२.०४.२०२६ रोजीच्या, सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र. १३२१६ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उपकलम (१) अंतर्गत नगररचना परियोजना करण्याचा इरादा जाहीर करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना प्रदान करण्यात आले आहेत;

आणि ज्याअर्थी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी, सिडको संचालक मंडळाच्या दिनांक ०२.०४.२०२६ रोजीच्या ठराव क्र. १३२१६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक २७.०४.२०२६ रोजी क्र. CIDCO/NAINA/PLNG/SP(DP-I)/TPS-13&14/2026/E-494345, उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार नगररचना परियोजना क्र. १४ करण्याचा इरादा जाहीर करण्यास मंजुरी दिली आहे;

आता, म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उपकलम (२) द्वारा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील चिंचवण व शिरढोण या गावांमध्ये भागशः (नकाशात दर्शविल्याप्रमाणे) नगररचना परियोजना क्र .१४ करण्याचा इरादा जाहीर करत आहे;

आणि ज्याअर्थी, सिडको संचालक मंडळाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, सिडकोच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी (VC & MD) दिनांक २९.०४.२०२६ रोजीच्या कार्यालयीन आदेश क्रमांक CIDCO/MD/2026/E-495085 अन्वये, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० च्या पोट-कलम (अ) नुसार, नगररचना योजना १३ आणि नगररचना योजना १४ (TPS 13 & 14) ची प्रक्रिया राबवण्यासाठी आणि कर्तव्ये बजावण्यासाठी वरिष्ठ नियोजनकार (DP-I), नैना, सिडको यांची 'नगररचना अधिकारी' (Town Planning Officer) म्हणून नियुक्ती केली आहे.

प्रस्तावित टीपीएस क्र. १४ मध्ये समाविष्ट पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील चिंचवण व शिरढोण या गावांमध्ये भागशः जमिनीवर सक्षम प्राधिकाऱ्याकडून वैध बांधकाम परवानगी मिळाली असल्यास अशा परवानगीचा तपशील नैना कार्यालयाकडे सादर करण्याची जमीन मालकांना विनंती करण्यात येत आहे. योजनेत सहभागी असलेल्या जमीन धारकांची संयुक्तिक अथवा वैयक्तिक मालकांची जमीन असेल आणि असे जमीन मालक एकच अंतिम भूखंड मिळण्यास इच्छूक असतील तर त्याना उक्त अधिनियमाच्या कलम ६५ नुसार एकच अंतिम भूखंड मिळणेसाठी शक्यतो १५ दिवसांच्या आत पत्राद्वारे संमती देण्यास विनंती आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उपकलम (३) च्या तरतुदींनुसार, नगररचना परियोजना क्र. १४ मध्ये अंतर्भूत करण्यात येणारे क्षेत्र (गुलाबी रंगाच्या सीमेने) दर्शविलेल्या नकाशाची प्रत जनतेच्या अवलोकनासाठी नियोजन (नैना), ७ वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

विषयांकित परियोजनेचे सिमाक्षेत्र दर्शविणारा नकाशा संबंधित गावांच्या ग्रामपंचायत कार्यालयात अवलोकनासाठी उपलब्ध राहतील. सदर सूचना व नकाशा सिडकोच्या संकेतस्थळ *http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx.* येथे सुद्धा उपलब्ध राहतील.

नगररचना परियोजना क्रमांक १४ मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे आहेतः—

**उत्तरेला** - TPS 11 च्या सीमेला लागून

**पूर्वेला** - शिरढोणच्या गावातील टेकड्यांना लागून

**दक्षिणेला** - शिरढोण आणि चिंचवण गावांच्या टेकड्यांना लागून

**पश्चिमेला** - चिंचवण गावाची सीमा आणि चिंचवण गावातील टेकड्यांना लागून

सिडको संचालक मंडळाच्या आदेशानुसार.

**आशुतोष व. उइके,**
मुख्य नियोजनकार (नैना).

नोंदणीकृत कार्यालय : निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

दिनांक : २९.०४.२०२६.

**CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.**

*NOTICE*

UNDER SECTION 60(2) OF THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

**Town Planning Scheme No. 14 (TPS-14)**

CIDCO/CP(NAINA)/ TPS-13 & 14/2026/1471

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (*b*) of Sub-section (*1*) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS -1712/475/CR-98/12/UD-12, dated 10.01.2023 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein;

And whereas, the Government of Maharashtra *vide* Notification No. TPS-1215/245/CR-332/2015/SM/UD-12, dated 27.04.2017 has sanctioned part of the Interim Development Plan (IDP) for the 23 villages of NAINA, and also *vide* Notification No. TPS. 1215/245/C.R. 332/16/EP/UD-12, dated 01.03.2019 has sanctioned the Excluded Parts of the IDP under Section 31(*1*) of the said Act;

And whereas, *vide* Notification No. TPS.1717/MIS 2750/ C.R. 91/2019/UD-12, dated 16.09.2019 sanctioned part of the Development Plan of 152 villages of said notified area which has come into force with effect from 16.10.2019;

And whereas, *vide* Notification No. TPS- 1221/2461/C.R.83/21/UD-12 dated 04.03.2024, appointment of the CIDCO as Special Planning Authority for the 80 villages of Navi Mumbai Airport Influence notified area (NAINA) and 33 villages from the Khopta New Town Notified area is withdrawn by the Government of Urban Development Department (UDD) under section 160 of the said Act;

And whereas, The Interim Development Plan (IDP) and Development Plan (DP) for NAINA is currently being implemented through Town Planning Schemes (TPS) 1 to 12, which are at various stages of completion. On same lines, implementation of part of remaining area of DP of NAINA has now been initiated through a new scheme TPS 14;

And whereas, the Board of CIDCO *vide* Resolution No. 13216, dated 02.04.2026 has authorised VC&MD, CIDCO for Declaration of Intention under sub-section (*1*) of section 60 of the said act;

And whereas, VC&MD, CIDCO in accordance with the powers delegated by CIDCO Board accorded approval *vide* CIDCO/NAINA/PLNG/SP(DP-I)/TPS-13&14/2026/E-494345 dated 27.04.2026 for Declaration of Intention for Town Planning Scheme No. 14 under Sub-Section (*1*) of Section 60 of the said Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by Sub-Section (*2*) of the Section 60 of the said Act, the Corporation hereby publishes its declaration of making Town Planning Scheme (TPS) No. 14 at part of Villages *viz.* Chinchavan and Shirdhon of Taluka – Panvel, District Raigad as shown on plan;

And whereas, VC&MD, CIDCO in accordance with the powers delegated by CIDCO Board, issued Office Order No. CIDCO/MD/2026/E-495085 dated 29.04.2026 appointed the Senior Planner (DP-I), NAINA, CIDCO as Town Planning Officer for TPS 13 & TPS 14 under Sub-Section (A) of Section 60 of the said Act;

Land owners who are having valid building permissions obtained from Competent Authority, within the boundary of proposed TPS No. 14 (Shown by PINK Border on plan) of villages Chinchavan and Shirdhon of Taluka – Panvel, District Raigad are requested to submit details of the same to NAINA office. Participants having land ownership jointly or severally willing to obtain a single final

plot are requested to submit their consent under section 65 of the said Act for providing single plot preferably within 15 days.

In accordance with the provisions of Section 60(*3*) of the said Act, a copy of the declaration along with the plan showing boundary of TPS 14 (Shown by PINK Border) is kept open for inspection for public in the office of Planning (NAINA), 7th Floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai - 400 614 during office hours.

Copies of the plan showing the area of TPS 14 are also kept for inspection for public in the Grampanchayat Offices of the villages included in the said TPS 14. Copy of the notice & plans are also available on CIDCO's website *http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx*.

The area included in the Town Planning Scheme 14 (TPS 14) is bounded as stated below:—

| | |
|---|---|
| *On the North* - | by the TPS 11 Boundary |
| *On the East* - | by the hills of Shirdhon Village |
| *On the South* - | by the hills of Shirdhon and Chinchavan Village |
| *On the West* - | by the Chinchavan Village Boundry and hills of Chinchavan Village |

By the order of Board of Directors of the Corporation.

ASHUTOSH V. UIKEY,
Chief Planner (NAINA).

Regd. Office: Nirmal, 2nd floor, Nariman Point, Mumbai-400 021.

Date: 29.04.2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.